दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८८ वा ● मंगळवार, ता. ०६ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## भारताचा पहिला स्वदेशी प्रदूषण नियंत्रण पोत 'समुद्र प्रताप' भारतीय तटरक्षक दलात दाखल

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारताच्या जहाजबांधणी व समुद्री क्षमता विकासातील आत्मनिर्भरतेला बळ देणारा महत्त्वाचा टप्पा गाठत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवार, ता. ५ जानेवारी २०२६ रोजी गोव्यात भारतीय तटरक्षक दलात 'समुद्र प्रताप' या पोताचे औपचारिक समावेशन केले.

भारतीय तटरक्षक बलाच्या ताफ्यातील हा आजवरचा सर्वात मोठा पोत असून गोवा शिपयार्ड लिमिटेडने निर्मित केलेला भारताचा पहिला स्वदेशी रचनेचा प्रदूषण नियंत्रण पोत आहे. ६० टक्क्यांहून अधिक स्वदेशी घटकांनी बनलेला 'समुद्र प्रताप' प्रदूषण नियंत्रण, अग्निशमन, समुद्री सुरक्षा व पर्यावरण संरक्षणासाठी तैनात राहणार आहे. या पोतामुळे भारतीय सागरी क्षेत्रात निगराणी व तातडीच्या प्रतिसाद क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होईल. प्रथमच, अग्रिम पंक्तीतील तटरक्षक पोतावर महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, ही समावेशकतेच्या दिशेने महत्त्वाची पायरी असल्याचे संरक्षण मंत्र्यांनी नमूद केले.

यावेळी राजनाथ सिंह म्हणाले की, भारतीय तटरक्षक दलाची बहुआयामी भूमिका शत्रूंना स्पष्ट संदेश देते कोणत्याही दुस्साहसाला ठोस व योग्य प्रत्युत्तर दिले जाईल. भारत ही जबाबदार सागरी शक्ती असून हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता व स्थैर्य राखण्यास कटिबद्ध आहे. बदलत्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर तटरक्षक दलाने प्लॅटफॉर्म-केंद्रिततेतून खुफिया व एकीकरण-केंद्रित दल म्हणून विकसित व्हावे, असेही त्यांनी सांगितले. 'समुद्र प्रताप'मध्ये अत्याधुनिक प्रदूषण शोध प्रणाली, तेलगळती प्रतिसाद साधने, अग्निशमन क्षमता, हेलिकॉप्टर हँगर व विमानन सहाय्य सुविधा आहेत. हे पोत खराब समुद्री परिस्थितीतही स्थिरपणे कार्यक्षम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. हा पोत कोची येथे तैनात राहणार असून पश्चिम तटरक्षक क्षेत्राच्या परिचालन नियंत्रणाखाली कार्यरत राहील.

## पालेकर, परब यांची 'आप'ला सोडचिठ्ठी

### निवडणुक अपयशाचे खापर अमान्य

**पणजी । रयत समाचार**



जिल्हा पंचायत निवडणुकीनंतर आम आदमी पक्ष गोव्यातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून, या वादाचे पडसाद आज उघडपणे उमटले. पक्षाच्या गोवा प्रभारी आतिषी मार्लेना यांच्या उपस्थितीत मागील आठवड्यात झालेल्या बैठकीतील मतभेदांच्या पार्श्वभूमीवर प्रभारी प्रदेशाध्यक्ष श्रीकृष्ण परब आणि माजी प्रदेशाध्यक्ष ॲड. अमित पालेकर यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. जिल्हा पंचायत निवडणुकीत आम आदमी पक्षाने एकूण ४२ जागा लढवल्या होत्या. ॲड. अमित पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडली होती. उमेदवारांना मिळणाऱ्या प्रतिसादावरून किमान सात ते आठ जागा जिंकण्याची अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र, प्रत्यक्षात कोलवाची एकमेव जागा पक्षाला मिळाल्याने अपेक्षाभंग झाला.

या निकालानंतर पक्षाने तात्काळ पालेकर यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपद काढून घेऊन श्रीकृष्ण परब यांची प्रभारी प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर पालेकर काही कार्यक्रमांना अनुपस्थित राहिल्याची चर्चा पक्षात सुरू होती. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात गोवा प्रभारी आतिषी मार्लेना गोव्यात आल्यानंतर जिल्हा पंचायत निवडणुकीचा आढावा घेण्यासाठी एका हॉटेलमध्ये चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीदरम्यान तीव्र वादाचे प्रसंग घडले. या घटनेचे वृत्त प्रसारमाध्यमांपर्यंत पोहोचताच पक्षांतर्गत खळबळ उडाली. या वादाच्या पार्श्वभूमीवर आज पालेकर आणि परब यांनी आपला निर्णय जाहीर करत पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांना राजीनाम्याचे पत्र पाठविले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. अमित पालेकर यांनी जिल्हा पंचायत निवडणुकीतील अपयशाचे खापर स्वतःवर फोडण्यास स्पष्ट नकार दिला. ''मी माझा जवळजवळ सर्व वेळ पक्षासाठी दिला. स्वतःचा व्यवसाय आणि कौटुंबिक जीवन बाजूला ठेवून काम केले. आमच्या टीमने प्रामाणिक प्रयत्न केले, तरी कोणतीही चर्चा न करता पदावरून दूर करणे अयोग्य होते,'' असे पालेकर म्हणाले. दरम्यान, केजरीवाल यांना लिहिलेल्या पत्रात पालेकर यांनी पक्षातील निर्णयप्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली आहे.

''संवाद आणि सल्लामसलत मर्यादित असतील व निर्णय वरूनच घेतले जात असतील, तर व्यक्ती नव्हे तर संस्था कमकुवत होतात. लोकशाही कार्यपद्धतीची पुनर्व्याख्या करण्यासाठी उभ्या राहिलेल्या चळवळीसाठी ही बाब अत्यंत निराशाजनक आहे,'' असे त्यांनी नमूद केले आहे. या घडामोडींमुळे गोव्यातील आम आदमी पक्षाच्या नेतृत्वावर आणि भविष्यातील राजकीय वाटचालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## नरेंद्र मोदींच्या स्वातंत्र्यदिन भाषणांचे उर्दू संकलन 'खुत्बात-ए-मोदी' प्रकाशित

**नवी दिल्ली । रयत समाचार**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सोमवार, ता. ५ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे Khutbat-e-Modi: Lal Qila Ki Faseel Se या पुस्तकाचे प्रकाशन केले. या पुस्तकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ ते २०२५ या कालावधीत लाल किल्ल्यावरून दिलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणांचे उर्दू भाषेतील संकलन करण्यात आले आहे. हे पुस्तक नॅशनल कौन्सिल फॉर प्रमोशन ऑफ उर्दू लँग्वेज (NCPUL), नवी दिल्ली यांनी प्रकाशित केले असून ही संस्था शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संस्था आहे. यावेळी बोलताना धर्मेंद्र प्रधान यांनी उर्दू भाषेत 'खुत्बात-ए-मोदी' प्रकाशित होणे ही भाषिक समावेशनाच्या दिशेने महत्त्वाची पायरी असल्याचे सांगितले.

पंतप्रधानांच्या भाषणांमध्ये अंत्योदय, गरीब कल्याण, स्वच्छ भारत, राष्ट्रीय एकता तसेच १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा व्यक्त झाल्या असून 'नव्या भारताचे' स्पष्ट चित्रण त्यातून होते, असे त्यांनी नमूद केले. अशा प्रकाशनांमुळे नागरिकांना पंतप्रधानांचे विचार, विकासदृष्टी व धोरणे थेट समजण्यास मदत होते. हे पुस्तक देशभरातील ग्रंथालयांमध्ये पोहोचावे व 'विकसित भारत' या संकल्पनेवर व्यापक संवाद घडावा, अशी अपेक्षा प्रधान यांनी व्यक्त केली. तसेच उर्दू भाषेत भारताची सांस्कृतिक परंपरा, वारसा व ज्ञानपरंपरेवरील साहित्य प्रकाशित करण्यासाठी NCPUL ने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास शिक्षण मंत्रालयाचे सचिव डॉ. विनीत जोशी, भारतीय भाषा समितीचे अध्यक्ष पद्मश्री चामू कृष्ण शास्त्री NCPUL चे संचालक डॉ. शम्स इक्बाल, अलीगढ मुस्लिम विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. नईमा खातून यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मुंढवा जमीन व्यवहारात ३०० कोटींचा गैरव्यवहार

### माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांचा दावा

**पुणे । रयत समाचार**



माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी पुण्यातील मुंढवा येथील जमीन व्यवहारात ३०० कोटींहून अधिक रकमेचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित व्यवहारांचा उल्लेख करत, कुंभार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. कुंभार यांनी सांगितले की, मुंढवा जमीन व्यवहारातील करारात साक्षीदार असलेली एकच व्यक्ती व काही इतर सदस्य विविध प्रकरणांत आढळून येत असून, संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. या भूखंडावर उभारलेल्या प्रकल्पातील काही मालमत्ता चालू बाजारभावानुसार विक्री करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले. ते म्हणाले की, पुण्यातील शिवाजीनगर येथील सुमारे दोन एकर जमीन धर्मादाय आयुक्तालयाकडून ६० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर एका कंपनीला देण्यात आली. पुढे एफएसआय वाढवून १५ हजार चौरस फूट जागेवर ६३ हजार चौरस फूट बांधकाम करण्यात आले असून, याची नोंद महारेराकडे उपलब्ध आहे. मात्र, भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेचे अधिकार नसताना ती इतर संस्था व कंपन्यांकडे हस्तांतरित दाखविण्यात आली आणि सहा मजले विकल्याचा आरोप त्यांनी केला. या व्यवहारांची किंमत ३०० कोटींपेक्षा अधिक असल्याचा दावा कुंभार यांनी केला. याशिवाय, भाडेपट्ट्यावरील जागेवर कर्ज घेता येत नसतानाही सुमारे २५ कोटींचे कर्ज काढण्यात आल्याचा आरोप करत, सन २०१७ पासून सुरू असलेल्या बांधकामाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. हे सर्व आरोप असून संबंधित प्रकरणी अधिकृत चौकशीची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

## मजुरांच्या सुरक्षेसाठी शेतकरी बंदूक घेऊन वावरात



**अहमदनगर । रयत समाचार**

शेतकरी हा जगाचा पोशिंदा असला, तरी गेल्या काही काळापासून शेतकऱ्यांवर नवे संकट ओढावले आहे. शेतीची अवजारे हातात घेऊन राबणारा शेतकरी आता स्वतःच्या व शेतमजुरांच्या सुरक्षेसाठी बंदूक हातात घेऊन शेतात उभा असल्याचे चित्र अहिल्यानगर जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतातील कामांसाठी मजूर मिळणे कठीण झाले असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अहिल्यानगरच्या राहुरी तालुक्यातील खुडसर गावातील शेतकरी सतीश पवार यांचा हातात बंदूक घेऊन शेतमजुरांचे संरक्षण करतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सतीश पवार यांच्याकडे सुमारे सात एकर शेती असून डिसेंबरमध्ये कांदा लागवडीसाठी मजूर मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र बिबट्यांच्या धोक्यामुळे एकही मजूर कामासाठी तयार नसल्याने, मजुरांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वतः घेत त्यांनी बंदूक घेऊन शेतात उभे राहण्याचा निर्णय घेतला. खुडसरसह पाथरे, मायगाव, मांजरी परिसरात सध्या २० ते २५ बिबटे मुक्तपणे फिरत असल्याची माहिती आहे. या बिबट्यांनी अनेक कुत्रे व पाळीव प्राणी मारल्याने नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. दिवसा मजूर शेतात काम करतात, मात्र संध्याकाळी व रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जाताना शेतकऱ्यांना स्वतःच्या सुरक्षेसाठी बंदुका बाळगाव्या लागत आहेत. वनविभागाने काही ठिकाणी पिंजरे लावले असले, तरी चार गावांसाठी केवळ एकच पिंजरा असून त्यात बिबटे अडकत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सतीश पवार यांनी २०१० साली बंदूक परवाना घेतला होता, मात्र आज शेती व मजुरांच्या संरक्षणासाठी ही बंदूक वापरण्याची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले. ''माझ्याकडे बंदूक आहे, पण इतर शेतकऱ्यांनी काय करायचे?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. बिबट्यांना पकडण्यासाठी अधिक पिंजरे, शेतकऱ्यांचे संरक्षण आणि रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. वनविभागाच्या माहितीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे ११०० बिबटे असून, राहुरी तालुक्यातच जवळपास २५० बिबटे आहेत. वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतीची कामे ठप्प झाली असून, शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

## मराठी ही केवळ संवादाची नव्हे तर रोजगाराची भाषा– उपमुख्यमंत्री शिंदे



**सातारा । रयत समाचार**

मराठी भाषा हा आपल्या संस्कृतीचा आत्मा, अस्मिता व अभिमान आहे. मराठी टिकली नाही तर आपले अस्तित्वही धोक्यात येईल, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. मराठी केवळ संवादाची भाषा न राहता ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. मराठीचे व्यावसायिक महत्त्व जपत तिचा दरारा व दिमाख कायम ठेवणे ही आपली पवित्र जबाबदारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांनी केले. सातारा येथे १ ते ४ जानेवारी दरम्यान आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. या संमेलनासाठी शासनाने ३ कोटी रुपयांचा निधी दिला असून, पुढील साहित्य संमेलनांनाही निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.शिंदे म्हणाले की, हे संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून मराठी भाषेच्या सांस्कृतिक आत्मविश्वासाचा उत्सव आहे. शंभरावे साहित्य संमेलनही भव्य स्वरूपात होईल. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे आभार मानले.

राज्यात हिंदी भाषेची सक्ती होणार नाही, मराठीचा सन्मानच वाढवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच एसटी बसस्थानकांत मराठी ललित पुस्तकांसाठी सवलतीच्या दरात स्टॉल उपलब्ध करून देणे व लेखन-प्रकाशनावरील कर कमी करण्याचे प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, स्वागताध्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, आमदार महेश शिंदे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी शंभराव्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर अनुवाद समिती पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संमेलनास सातारकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार मानले. संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी मराठी भाषेच्या सांस्कृतिक अस्तित्वासाठी लढा सुरूच राहील, अशी ग्वाही दिली. समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद कुलकर्णी यांनी केले, तर सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले.

## आ. राजळेंचे पुन्हा 'धक्का तंत्र'; राष्ट्रवादीच्या टेके भाजपच्या गळाला



**पाथर्डी । नितीन गटाणी**

नगरपालिकेच्या गट नोंदणीच्या वेळी पुन्हा एकदा 'धक्का तंत्रा'चा अवलंब करत आमदार मोनिका राजळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका सदस्याला आपल्या गोटात घेत मोठी राजकीय खेळी यशस्वी केली. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात भारतीय जनता पार्टीची गट नोंदणी झाली. पाथर्डी नगर परिषदेच्या गटनेतेपदी डॉ. शारदा मृत्युंजय गर्जे यांची निवड करण्यात आली. याच वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून निवडून आलेल्या वंदना सोमनाथ टेके यांची जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली एंट्री भाजपच्या नगरसेवकांसाठी अनपेक्षित ठरली. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत २० पैकी भाजपचे १४, राष्ट्रवादीचे ५ व एक अपक्ष असा बलाबल आहे. सात सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य या नियमानुसार दोन स्वीकृत सदस्य निवडले जाणार आहेत. त्यासाठी भाजपकडे १६ सदस्यांची गरज होती; मात्र नगराध्यक्षांच्या एका मतासह भाजपकडे एकूण १५ मते होती. या पार्श्वभूमीवर आमदार मोनिका राजळे यांनी वंदना टेके यांना भाजपच्या गोटात सामील करून घेत दोन्ही स्वीकृत नगरसेवक आपल्या पारड्यात पाडण्याची खेळी यशस्वी केली. या घडामोडीनंतर शहरात चर्चेला उधाण आले असून पुढील काळातही अशाच पद्धतीने 'धक्का तंत्र' वापरले जाईल, अशी चर्चा भाजपच्या गोटात सुरू आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभाराकडे राजकीय निरीक्षकांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे. एकूणच अनपेक्षित राजकीय घडामोडींमुळे भाजपमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या घडामोडींचा परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत दिसून येईल, असे बोलले जात आहे.

### राष्ट्रवादीची गट नोंदणी न झाल्याचा भाजपला लाभ

**पालिका निवडणुकीचा निकाल लागूनही राष्ट्रवादीकडून गट नोंदणी न झाल्याचा फायदा भाजपने उचलला. यापूर्वी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार संजय भागवत यांनी घेतलेली माघार आणि आता टेके यांचा भाजपला मिळालेला पाठिंबा यामुळे आमदार राजळे यांची चाणाक्ष खेळी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.**

## स्वस्त साडीच्या ऑफरने महिलांची गर्दी

### चेंगराचेंगरी, मोठी दुर्घटना टळली

**छत्रपती संभाजीनगर । रयत समाचार**

नव्याने सुरू झालेल्या कपड्याच्या दालनाच्या उद्घाटनदिनी जाहीर केलेल्या आकर्षक ऑफरमुळे रविवार, ता. ४ आकाशवाणी चौक परिसरात मोठी चेंगराचेंगरी झाली. सोशल मीडियावर झालेल्या जोरदार जाहिरातीमुळे शहरासह वाशिम, जालना, परभणी, नांदेड आदी जिल्ह्यांतून शेकडो महिला व नागरिक सकाळपासूनच खरेदीसाठी दाखल झाले होते. सकाळी ११ वाजता उद्घाटन झाल्यानंतर पाच हजार रुपयांची साडी अवघ्या १९९ रुपयांत मिळत असल्याची जाहिरात व्हायरल झाल्यामुळे मोठ्या संख्येने ग्राहक दुकानात जमा झाले. एकाच वेळी दुकानात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. केवळ एकच शटर असल्याने प्रवेशद्वारावर प्रचंड गोंधळ उडाला. गर्दी वाढत गेल्याने काही महिलांना चक्कर येऊ लागली व श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच एका नागरिकाने डायल ११२ वर कॉल करून माहिती दिली. त्यानंतर काही वेळातच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेत चक्कर आलेल्या महिलांना बाहेर काढले. अधिक कुमक मागवून गर्दीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सर्व नागरिकांना बाहेर काढल्यानंतर स्पीकरवरून दुकान बंद करण्याची घोषणा करण्यात आली. दुकानाच्या उद्घाटनाबाबत व संभाव्य गर्दीबाबत दुकानदाराने पोलिसांना कोणतीही पूर्वकल्पना दिली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांचा जीव धोक्यात घालण्यात आल्याप्रकरणी योग्य ती कारवाई केली जाईल, असे पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांनी सांगितले. वेळेत पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.







## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक




### प्रभाग ८ च्या सर्वांगीण विकासासाठी

## माझा निर्धार

मी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या संपर्कात आहे. समाजासाठी काहीतरी ठोस आणि उपयुक्त करावे, या भावनेतूनच विवेकानंद सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात काम सुरू केले. या प्रवासात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप, तरुणांना खेळासाठी प्रोत्साहन देण्यासाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन, समाजप्रबोधनासाठी विविध कार्यक्रम व व्याख्यानमाला असे अनेक उपक्रम राबवले. या उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली आणि लोकांच्या अडचणी जवळून समजून घेता आल्या. सामाजिक काम करत असताना मला नेहमीच जाणवले की, केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती महत्त्वाची आहे. त्यामुळेच येत्या महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ क मधून शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवारी करण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीनंतर प्रभागातील ओपन स्पेसचा विकास, महिलांसाठी ओपन जिम, लहान मुलांसाठी सुरक्षित खेळाची मैदाने, ठिकठिकाणी वृक्षारोपण, तसेच विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालये सुरू करणे, या बाबींवर प्राधान्याने काम करण्याचा माझा निर्धार आहे. विकास हा कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसला पाहिजे, हीच माझी भूमिका आहे. आजवर समाजकार्यातून मिळालेला अनुभव, लोकांचा विश्वास आणि प्रभागाच्या विकासाची स्पष्ट दिशा याच्या जोरावर मी ही निवडणूक लढवत आहे. जनतेने दिलेला विश्वास प्रामाणिकपणे निभावून, प्रभाग ८ क ला विकासाच्या वाटेवर नेण्याचा माझा ठाम संकल्प आहे.

**प्रभाग क्रमांक ८ क**
**नवनाथ मच्छिंद्र कातोरे**
**उमेदवार शिवसेना (शिंदे गट)**

# विकासाच्या मुद्द्यावर शिवसेना मैदानात- अनिल शिंदे

## प्रभाग ९ मध्ये प्रचाराचा जल्लोषात शुभारंभ

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने प्रभाग क्रमांक ९ मधील सर्व अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ कल्याण रोडवरील मोहटा देवी मंदिर परिसरात जल्लोषात करण्यात आला.

या प्रचारारंभाचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवसेनेचे झेंडे, घोषणाबाजी व ढोल–ताशांच्या गजरात संपूर्ण परिसर भगवा झाला होता. या प्रसंगी प्रभाग क्रमांक ९ मधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार संजय शेंडगे, वैशाली नळकांडे, सचिन शिंदे व रुपाली दातरंगे यांच्यासह पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच संदेश कार्ले, गणेश कवडे, श्याम नळकांडे, संभाजी कदम, दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दीपक खैरे, माजी महापौर रोहिणी शेंडगे, माजी नगरसेवक अर्जुनराव दातरंगे, रामभाऊ नळकांडे, संदीप दातरंगे यांच्यासह प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. प्रचारारंभप्रसंगी बोलताना अनिल शिंदे म्हणाले की, शिवसेना ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून सामान्य जनतेच्या सुख–दुःखात सहभागी होणारा पक्ष आहे. प्रभाग क्रमांक ९ मध्ये शिवसेनेच्या उमेदवारांनी पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, स्वच्छता व नागरी सुविधांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. विकास, पारदर्शकता व विश्वासाच्या जोरावर नागरिक शिवसेनेच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उमेदवार संजय शेंडगे म्हणाले की, प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.




विकासकामांमध्ये पारदर्शकता ठेवून नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न राहील. उमेदवार वैशाली नळकांडे यांनी महिलांचे सक्षमीकरण, स्वयंसहायता गट, आरोग्य व शिक्षण सुविधा मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. उमेदवार रुपाली दातरंगे यांनी स्वच्छता, पाणीपुरवठा व मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर उमेदवार सचिन शिंदे यांनी तरुणांसाठी रोजगाराच्या संधी तसेच क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्यावर भर देणार असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रचार अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार केला. नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रचारारंभाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# बोज्जा यांच्या कामाची पावती मतदार मतातून देतील – सब्बन

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ६ मधून वीणा श्रीनिवास बोज्जा हे अपक्ष निवडणूक लढवित असून त्यांच्या प्रचाराचा शुभारंभ मा. अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे राज्य उपाध्यक्ष अशोक सब्बन यांच्या हस्ते झाले या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते अर्शद शेख, जेष्ठ नागरिक अशोक काळे, मा. आकाशवाणी प्रमुख राजेंद्र दासरी सह प्रभागातील नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी उपस्थितांचे स्वागत करून म्हणाले कोणत्याही राजकीय पक्षांवर विश्वास नसल्यामुळेच अपक्ष निवडणूक लढविण्याचे निश्चित केले असून निवडून आल्यानंतर निस्वार्थी पणे प्रभागातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल असे म्हणाले. या वेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक सब्बन म्हणाले, राजकारणाने तरुण पिढी बरबाद झाली असून तरुण पिढीने सामाजिक चळवळी कडे वळणे गरजेचे असून चांगले व प्रामाणिक काम केल्यास निश्चित यश प्राप्त होते. सदर प्रचार फेरी, श्रमिक नगर येथून रेणाविकर कॉलोनी, प्रतिमा कॉलोनी, लोकमान्य नगर, श्रेयस कॉलोनी, भिस्तबाग चौक, पोलीस कॉलोनी, रासने नगर मार्गे सोना नगर चौक येथे समारोप करण्यात आले. या वेळी उपस्थितांचे आभार मा. नगरसेविका वीणा बोज्जा यांनी मानले. सदर प्रचार फेरीत विनायक जोग, राजेंद्र द्यावनपेल्ली, राजू मंचे, अजय कोडम, राजू बुरा, लक्ष्मण अंदे, दत्तात्रय रामगिरी, संदुपटला, चंद्रकांत कोडम, गणेश बिटला, गणेश कोडम, रवि आगरकर, अमित बुरा, मनोज येनगंदूल, नरेश कांबळे, आदिनाथ भोसले, विशाल धात्रक, संजय भालेराव, श्याम पारेकर, विनय गुंदेचा, गणेश येनगंदूल, संतोष रायपेल्ली आदिसह महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बिनविरोध नगरसेवकांची माहिती निवडणूक आयोगाकडे सादर

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा लवकरच होणार आहे. मात्र राज्यभरात बिनविरोध निवडीवरून सुरू असलेल्या आरोप–प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने सर्व महापालिकांकडून सविस्तर माहिती मागविली होती. त्यानुसार संपूर्ण अहवाल आयोगाकडे सादर केल्याची माहिती आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी यशवंत डांगे यांनी दिली. बिनविरोध निवडून आलेल्या पाच नगरसेवकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे कुमार वाकळे व प्रकाश भागानगरे, तसेच भारतीय जनता पक्षाच्या पुष्पा बोरुडे, सोनाबाई शिंदे व करण कराळे यांचा समावेश आहे. या पाचही जागांवरील अधिकृत घोषणा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करण्यात येणार आहे. दरम्यान, उर्वरित ६३ जागांसाठी २८३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अर्ज छाननीदरम्यान शिवसेना (शिंदे गट)च्या पाच उमेदवारांचे अर्ज बाद ठरले होते. त्यानंतर अर्ज माघारीच्या टप्प्यात शिवसेना तसेच महाविकास आघाडीतील काही उमेदवारांनी माघार घेतल्याने काही प्रभागांमध्ये बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. अहिल्यानगरप्रमाणेच राज्यातील अनेक महापालिकांमध्ये बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने मागविलेल्या माहितीनुसार अहिल्यानगर महापालिकेने आवश्यक तपशील सादर केला असून पुढील कार्यवाही आयोगाच्या पातळीवर होणार आहे.




# शहरात ३४५ मतदान केंद्र निश्चित; महिला मतदारांसाठी विशेष पाऊल

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रशासनाने कंबर कसली असून शहरात एकूण ३४५ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी १७ प्रभागांच्या मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याची माहिती दिली. या यादीनुसार प्रभाग क्रमांक १० मध्ये सर्वाधिक २६ मतदान केंद्रे असतील, तर प्रभाग क्रमांक ३ मध्ये सर्वात कमी १६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. प्रशासनाच्या माहितीनुसार प्रभाग १ मध्ये २५, प्रभाग २ मध्ये २४, प्रभाग ४ मध्ये २२, प्रभाग ५ मध्ये १७, प्रभाग ६ मध्ये १९, प्रभाग ७ मध्ये १८, प्रभाग ८ मध्ये २०, प्रभाग ९ मध्ये १९, प्रभाग ११ मध्ये २२, प्रभाग १२ मध्ये २२, प्रभाग १३ मध्ये १८, प्रभाग १४ मध्ये १९, प्रभाग १५ मध्ये १९, प्रभाग १६ मध्ये २१ आणि प्रभाग १७ मध्ये १७ मतदान केंद्रे असतील. निवडणूक प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रशासनाने विशेष पाऊल उचलले असून, ज्या प्रभागांमध्ये महिला मतदारांची संख्या जास्त आहे, तेथे किमान एक 'महिला मतदान केंद्र' उभारले जाणार आहे. तसेच मतदारांच्या सुविधेसाठी ठिकठिकाणी आदर्श मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या प्रभागातील मतदान केंद्रांची माहिती घेण्यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.



# अपक्षांच्या पॅनलचा झंझावाती प्रचार

## स्वाभिमान व अस्मिता जपण्यासाठी लढा

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगावमधील प्रभाग क्रमांक १६ मध्ये चुरशीची लढत होत आहे. राजकीय पक्षांच्या उमेदवारांपेक्षा चौघा अपक्ष उमेदवारांच्या पॅनलची चर्चा अधिक रंगत आहे. माजी नगरसेविका सविता अशोक कराळे, विमल दादू कांबळे, सागर अंजाबापू सातपुते आणि भूषण गुंड या चौघांच्या पॅनलने प्रचारात जोरदार आघाडी घेत मतदारांना साद घातली आहे.

केडगावकरांची अस्मिता व स्वाभिमान जपण्याची ग्वाही देत हे उमेदवार मतदारांना साकडे घालत आहेत. केडगावचे 'कोथरूड' करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. प्रभाग १६ मध्ये कराळे परिवाराची मोठी क्रेझ असून, नगरसेविका असताना सविता अशोक कराळे यांनी केलेली विकासकामे मतदारांच्या लक्षात आहेत.

लोकांच्या मदतीला कायम धावून जाणारा परिवार म्हणून कराळे परिवाराची ओळख आहे. कार्यकर्त्यांची भक्कम फळी उभी करून, कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा अधिक ताकदीने केडगावचा स्वाभिमान व अस्मिता जपण्याचा विडा उचलून चौघेही उमेदवार निवडणूक लढवत आहेत. घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला जात असून, या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# प्रभाग ३ मधून शिवसेनेचे जोरदार शक्तीप्रदर्शन



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांनी झंझावाती प्रचार सुरू केला. सावेडी उपनगरातील प्रभाग ३ मध्ये शिवसेनेने सुशिक्षित, सुसंस्कृत व विकासाचे व्हिजन असलेले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. चंद्रकांत उर्फ काका सूर्यभान शेळके, संगिता रत्नाकर खरमाळे, स्वप्नजा विनय वाखुरे व नितीन शिवाजीराव शेलार या चार उमेदवारांच्या जाहीर प्रचाराचा शुभारंभ सिव्हिल हडको येथील गणेश चौकात करण्यात आला. यावेळी उमेदवारांनी मोठे शक्तीप्रदर्शन करीत विजयाचा विश्वास व्यक्त केला. प्रभाग ३ मध्ये चारही उमेदवारांचा दांडगा जनसंपर्क असून शिवसेनेच्या धनुष्यबाणाला मोठा पाठिंबा आहे. सावेडी उपनगराची सांस्कृतिक ओळख असलेल्या या प्रभागात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून भरीव विकासकामे करण्याची ग्वाही देत उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर–सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज–नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
– संपर्क –
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर–०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक :** दिपक शिरसाठ, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीरामपूरकरांना दिलासा!

## दहा तारखेपासून पाणीपुरवठा पूर्ववत होणार

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहरासाठी तयार होत असलेल्या नवीन साठवण तलावाचे काम सुरू असून पाणीसाठा कमी झाल्याने, पाटबंधारे खात्याचे रोटेशन येईपर्यंत जुन्या तलावातील साठवलेले पाणी पुरविणे आवश्यक असल्यामुळे मागील पंधरा दिवसांपासून श्रीरामपूर शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सात तारखेला भंडारदऱ्यातून पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी आवर्तन सोडले जाणार असून, हे पाणी नऊ तारखेपर्यंत श्रीरामपूरात येणार आहे. त्यामुळे दहा तारखेपासून सुमारे महिनाभर शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. कॅनलचे लांबलेले रोटेशन लक्षात घेता उपलब्ध पाणी महिनाभर पुरावे, यासाठी नगरपालिका प्रशासनाने दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर नगराध्यक्ष करण ससाणे व आमदार हेमंत ओगले यांनी तातडीने तलावाची पाहणी करून पाटबंधारे खात्याशी संपर्क साधत रोटेशन लवकर सोडण्याची विनंती केली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन सात तारखेला पिण्याच्या पाण्याचे रोटेशन सोडण्याचे आदेश दिले. हे रोटेशन महिनाभर चालणार असल्याने त्या कालावधीत शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यात येईल. त्यानंतर पुन्हा दिवसाआड पाणीपुरवठा केला जाईल, अशी माहिती नगरपालिका सूत्रांनी दिली. पाटबंधारे खात्याने रोटेशनची तारीख वेळेत जाहीर केली असती, तर सध्या दिवसाआड पाणीपुरवठ्याची गरज भासली नसती. कारण त्या वेळी १८ दिवस पुरेल इतका पाणीसाठा उपलब्ध होता. मात्र रोटेशनची तारीख जाहीर न झाल्याने खबरदारी म्हणून नगरपालिका प्रशासनाने दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. उंच इमारतींमध्ये राहणारे नागरिक पाण्याचा साठा करू शकतात; मात्र सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांकडे साठवणुकीची साधने नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असून, यामुळे नागरिकांना ४० वर्षांपूर्वीच्या पाणीटंचाईचे दिवस आठवत आहेत. साठवण तलावाचे बांधकाम सुरू असताना संभाव्य टंचाई टाळण्यासाठी तलावात भिंत घालून दोन भाग करून एका भागात पाणी साठवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र भराव वाहून गेल्याने तो काढून टाकावा लागला आणि पाणीसाठा करणे शक्य झाले नाही. जुना तलाव केवळ १८ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा देऊ शकतो. शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या पाईपलाईनमधून वारंवार गळती होत असून, वीजटंचाई व अपुरे व्होल्टेज यामुळेही अनेक भागांत पाणी वरच्या टाक्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे पाणीटंचाई अधिक तीव्र होत आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन सद्यस्थितीचा आढावा घेतला असून, भविष्यात शहरवासीयांना पाणीटंचाई भासू नये यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

**सात तारखेला कालव्यात पाणी आल्यानंतर महिनाभराचा प्रश्न सुटणार असून जानेवारी अखेरपर्यंत दररोज पाणीपुरवठा होईल. मात्र फेब्रुवारी ते मे या तीव्र उन्हाळ्यात रोटेशनचा कालावधी लांबला, तर पुन्हा दिवसाआड पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगराध्यक्ष करण ससाणे व आमदार हेमंत ओगले यांनी पाटबंधारे खात्याशी समन्वय साधून उन्हाळ्यातही शहराला दररोज पाणीपुरवठा कसा करता येईल, यासाठी नियोजन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**



### सांस्कृतिक कार्यक्रमातून सावित्रीबाई फुले यांना मानवंदना

# कला सम्राज्ञी पवळा कलामंचाच्या पुढाकारातून सवाद्य मिरवणूक

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

हिवरगाव पावसा येथे कला सम्राज्ञी पवळा कलामंच व ग्रामपंचायत हिवरगाव पावसा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त पारंपरिक सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. देवगड माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी या मिरवणुकीत सहभाग घेतला. कला सम्राज्ञी पवळा कलामंच संस्थेचे कलावंत कवी-गायक हरिश्चंद्र भालेराव व शाहीर मधुकर भालेराव यांनी लोककला व प्रबोधनात्मक गीतांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांना मानवंदना दिली. जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सरपंच सुभाष गडाख, रमेश पावसे, यादवराव पावसे, प्रा. बाबुराव पावसे, आर. पी. राहणे, भीमाशंकर पावसे, नितीनचंद्र भालेराव, अण्णासाहेब गोसावी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारत संपूर्ण गावातून काढलेल्या मिरवणुकीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी भाषणे व गीतांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव केला. स्त्री शिक्षण, समाजसुधारणा व समानतेसाठी त्यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व विद्यार्थ्यांनी विशद केले. मार्गदर्शन करताना प्रा. बाबुराव पावसे यांनी आज मुली विविध क्षेत्रांत यशस्वी होत असल्याचे नमूद करत, हीच सावित्रीबाई फुले यांना खरी आदरांजली असल्याचे सांगितले. सरपंच सुभाष गडाख यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यागाचे स्मरण ठेवून उज्वल यश संपादन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीनचंद्र भालेराव यांनी केले. कला सम्राज्ञी पवळा कलामंच व महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू विचारमंच संस्थेच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व देवगड माध्यमिक विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थांनी सहकार्य केले. कार्यक्रमास अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाकरवाडी शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

### आदिवासी मुलींच्या हस्ते सावित्रीबाईंना अभिवादन

**राहुरी । रयत समाचार**

मुळा धरणाच्या दुर्गम क्षेत्रातील आदिवासी भागात वसलेल्या राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी (आळे) येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात शाळेतील आदिवासी मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तथा शिक्षक नेते राजेंद्र निमसे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची महती विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितली. बालवयातच शिक्षणाचा वसा स्वीकारून त्यांनी केलेली अथक धडपड, समाजाकडून सहन करावी लागलेली अवहेलना, मुलींच्या शिक्षणासाठी सोसलेले कष्ट आणि अखेर मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू करून मिळवलेले यश यांचा प्रेरणादायी प्रवास त्यांनी प्रभावी शब्दांत मांडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या महान कार्याबद्दल मनोगते व्यक्त केली. शाळेतील सहशिक्षक



शौकत शेख यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. दुर्गम आदिवासी भागात शिक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.



# रंगुबाई बारहाते यांचे निधन

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील वयोवृद्ध, जुन्या पिढीतील रंगुबाई शंकर बारहाते (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या पंढरीनाथ बारहाते यांच्या मातोश्री होत. सुनील, अनिल, स्वप्नील, सोमनाथ व गणेश बारहाते यांच्या त्या आज्जी होत. परिसरात त्या 'काकू' या नावाने परिचित होत्या.

# प्रामाणिक, सातत्यपूर्ण कार्यातून मानसिक समाधान मिळते– कवी उदारे

**पाथर्डी । नितीन गटाणी**

कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे व सातत्यपूर्ण काम केल्यास मानसिक समाधान मिळते. समाज आपल्या कार्याचे कौतुक करतोच; मात्र घरच्या माणसांकडून मिळणारी शाब्बासकीची थाप अधिक चांगले काम करण्याची ऊर्जा देते, असे प्रतिपादन कवी राजेंद्र उदारे यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

कसबा तरुण मंडळाचे सचिव, होमगार्ड अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते असलेल्या राजेंद्र उदारे यांनी साहित्य क्षेत्रात दर्जेदार लेखन केले आहे. सातारा येथे झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ऊसतोड कामगारांच्या संघर्षमय जीवनाची व्यथा मांडणारी 'टिचभर पोटासाठी' ही कविता त्यांनी सादर केली होती. कसबा परिवार व पाथर्डी तालुक्याचा साहित्य क्षेत्रात मान



वाढवल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज पुतळा प्रांगणात नगराध्यक्ष अभय आव्हाड, मुख्याधिकारी संतोष लांडगे, नगरसेवक सुभाष बोरुडे यांच्या हस्ते राजेंद्र उदारे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी हभप मोहन सुडके, हिंदकुमार औटी, नगरसेवक महेश बोरुडे, नंदकुमार लांबदाडे, महेश काटे, नाथा कोकाटे मंडळाचे संघटक बाबू बोरुडे, उमेश केकाण तसेच कसबा भागातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.



# आदर्श विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**नेवासा । विजय खंडागळे**

आदर्श विद्यालय माध्यमिक, सोनई येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात येऊन माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी माजी मुख्याध्यापक खेसमाळसकर अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमास विद्यार्थी संघाचे अध्यक्ष देविदास शेटे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे, मुख्याध्यापक फोपसे, पवार , श्री. दराडे, श्री. दरंदले तसेच इतर शिक्षक, माजी विद्यार्थी व विद्यमान विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जमीर शेख यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. संकेत दरंदले यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी कृष्णा सुद्रीक, जालींद्र मुंगसे, मणिषा निमसे, वैभव शहा, महादेव दराडे यांच्यासह उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी शाळेच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये भौतिक सुविधा, विद्यार्थी गुणवत्ता संवर्धन, विद्यार्थी सुरक्षा, शालेय विविध कार्यक्रमांचे आयोजन, माजी विद्यार्थी बैठक, शालेय शिस्त व नवीन विद्यार्थी प्रवेश यांसारख्या विषयांचा समावेश होता.

# नृसिंह विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



**नगर तालुका । रावसाहेब राशिनकर**

श्री नृसिंह विद्यालय, चास येथे ३२ वर्षांनंतर एसएससी १९९३९४ बॅचचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या स्नेहमेळाव्यात अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करत शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी विद्यालयातील गुरुवर्य शिक्षकांनीही आपल्या आठवणी सांगत मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुंबे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या एडके यांनी केले, तर प्रास्ताविक अनिल गावखरे यांनी मांडले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. आभार प्रदर्शन प्रवीण कारले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विजू काळे, कैलास गावखरे, जितेंद्र मिसाळ, विलास कारले व इतर सहकारी मित्रांनी सहकार्य केले. अत्यंत उत्साही व आनंदी, खेळीमेळीच्या वातावरणात हा स्नेहमेळावा पार पडला.

# तहसील कार्यालयात आज राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

दरवर्षीप्रमाणे शासनस्तरावरून प्राप्त आदेशानुसार श्रीगोंदा तहसील कार्यालय येथे पुरवठा विभाग व अखिल भारतीय ग्राहक पंचायत श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, ता. ०६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी ज्ञानेश कोरे यांनी दिली. तहसीलदार यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध शासकीय खात्यांचे प्रमुख अधिकारी तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी उपस्थित राहून ग्राहकांच्या तक्रारींची सोडवणूक करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ज्या ग्राहकांना विविध खात्यांबाबत अडचणी किंवा तक्रारी असतील, त्यांनी त्या लेखी स्वरूपात घेऊन मंगळवार, ता. ०६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा सहसचिव जितेंद्र पितळे, तालुकाध्यक्ष अनंता पवार, पुरवठा शाखेतील प्रज्ञा थोरात, उपाध्यक्ष सतीश ओहळ, शिवाजी साळुंके, नंदकुमार कुरुमकर, पीटर रणसिंग, मदन गडदे, संतोष रोडे, संतोष जठार, जयश्री औटी, शुभांगी पावसे, गणेश गडदे, किरण शिंदे, गणेश लाढाणे, अजित पटवा, दत्तात्रय जगताप, दत्तात्रय हिरडे, सुरेश पिपाडा, सुरेश दांडेकर, किशोर शिंदे, प्रमोद पवार यांनी केले आहे.

# सुभेदार अजय साके यांचे जंगी स्वागत

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

कोळगाव येथील शहाजी साके व सरस्वती साके यांचे सुपुत्र सुभेदार अजय साके यांनी भारतीय सैन्य दलात २८ वर्षे देशसेवा केल्यानंतर ता. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यानंतर ते आपल्या कोळगाव गावी परतले असता, रविवारी ता. ४ जानेवारी २०२६ रोजी ग्रामस्थांनी फुलांची उधळण व जयजयकारात त्यांचे जंगी स्वागत केले. सुभेदार अजय साके हे १ जानेवारी १९९८ रोजी सैन्य दलात भरती झाले होते. २८ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी ४३ फील्ड रेजिमेंटमध्ये काम पाहिले. या कालावधीत ग्वाल्हेर, देवळाली, मेंढार (जम्मू-काश्मीर), लेह-लडाख, अजमेर (राजस्थान), गुजरात, मेरठ (उत्तर प्रदेश) आदी ठिकाणी कार्यरत राहून देशाचे रक्षण केले. त्यांच्या वडील व आजोबांनीही सैन्य दलात सेवा बजावली आहे. कोळगावमध्ये प्रवेश करताना तोफांची सलामी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सैनिक कार्यालय कोळगाव येथून



सजवलेल्या फुलांच्या गाडीतून सपत्नीक अजय साके यांची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत कोळाई देवी आजी-माजी सैनिक संघटना, त्रिदल सैनिक संघटना श्रीगोंदा व शहीद स्मारक समितीचे पदाधिकारी सहभागी झाले होते. 'जय जवान जय किसान', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. अजय साके व त्यांच्या पत्नी सुरेखा साके यांच्या हस्ते कोळाई देवी मंदिर परिसरात २१ वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यानंतर वीरभवन येथे कार्यक्रम पार पडला. यावेळी कोळगावचे सरपंच पुरुषोत्तम लगड, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनकर पंदरकर, हेमंत नलगे, माजी सैनिक अशोक जगताप, नवनाथ खामकर, विश्वास लगड यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी अजय साके यांनी शहीद स्मारकासाठी पाच हजार रुपयांची देणगी दिली. "तुम्ही सर्वांनी दिलेल्या गौरवाबद्दल मी ऋणी आहे. सैन्य दलातून निवृत्त झालो असलो तरी विविध माध्यमांतून समाजसेवा व देशसेवा सुरूच ठेवणार आहे," असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास वैभव चंदन, विकास खामकर, अनिल दळवी, नितीन नलगे, संतोष आवरे, सचिन नलगे, प्रदीप साके, उषा मेहेत्रे, वंदना मेहेत्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ता. ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# शिक्षणच समाज परिवर्तनाचे खरे साधन– विजयवंशी

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विज्ञान, चित्रकला प्रदर्शन

**अहमदनगर । आबीद खान**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ एक व्यक्ती नव्हत्या, तर संपूर्ण समाज परिवर्तनाची ज्योत होत्या. ज्या काळात मुलींना शिक्षणाचा अधिकार नाकारला जात होता, त्या काळात त्यांनी ज्ञानाचा दिवा हातात घेऊन समाजातील अंधकार दूर करण्याचे कार्य केले. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन आहे, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून समाजासमोर ठेवला, असे प्रतिपादन अहिल्यानगर छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी केले.



अहिल्यानगर छावणी परिषदेच्या महात्मा गांधी उर्दू स्कूल व सरदार वल्लभभाई पटेल मराठी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विज्ञान व चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते विज्ञान व चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. या कार्यक्रमास छावणी परिषदेचे वसंत राठोड, लेखापरीक्षक रमेश कासारस्थानी, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, ऐनुद्दीन शेख, मुख्याध्यापक संजय शिंदे, मुख्याध्यापक राजू भोसले, मुख्याध्यापिका मुबीना सय्यद, सुचिता टकले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनातून विविध शैक्षणिक प्रकल्प सादर केले. चित्रकला प्रदर्शनातून सामाजिक विषयांवर प्रकाश टाकण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी वक्तृत्वाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांचा प्रेरणादायी जीवनपट उलगडून दाखवला. या उपक्रमासाठी शिक्षक वैशाली शिंदे, अंकुश शेळके, रोहित परदेशी, अरविंद कुडिया, सुमैय्या सय्यद, शेख नवीदुस्सहेर, शरद पुंड, मयुरी पंधे, सोनाली झिरपे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली शिंदे यांनी केले, प्रस्ताविक राजू भोसले यांनी केले, तर आभारप्रदर्शन मुख्याध्यापिका मुबीना सय्यद यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकारणाच्या पलीकडचे नेहरू

या पुस्तकातले नेहरू राजकारणाच्या पलीकडचे. त्यामुळे राजकीय उल्लेख, घटना, पक्ष आदी अर्थानी कुठेच नाही. यात आहे भटकंती, पुस्तकं, साहित्य, भाषा अन त्याविषयी मनन, चिंतन अन काय करायला हवे याची स्वप्ने. हिमालय, त्यातील साहसी भटकंती, पायी, घोड्यावर, एकदा तर थोडक्यात वाचले दरी, शिखरे अन् त्यांची ओढ पण इच्छा असूनही वारंवार येता येत नाही, त्याच बरोबर या प्रदेशात रस्ते नाही म्हणून रखडलेला विकास याची खंत. त्यात कश्मीर, उत्तराखंडचे अलकंदा-भागीरथी संगम आहे तसेच मनिपूर, चीन, लंका ही. अनेक तुरुंगात तुरुंगवास अन् एकाकीपणात तुरुंगातील माशा, उंदीर, झुरळ, साप, विंचू यांचे निरीक्षण, डेहराडून तुरुंगात विंचू पकडून बाटलीत बंद करून ठेवणारे, एक जेलरची बदली त्याने पाळलेली कुत्री तो तिथेच ठेवून गेला, तिची पिल्ले अन् त्यांचे संगोपन करणारे नेहरू वाचताना हेच का ते नेहरू असा प्रश्न पडतो. डेहराडून, अल्मोरा, लखनऊ, कलकत्ता अशा अनेक तुरुंगात दिवस काढलेत नेहरूंनी. रेल्वे प्रवास आवडीचा कारण त्यात लिहिता वाचता येते. प्रवासात एक पेटी पुस्तकांची ठरलेली. भले सगळी वाचून होवोत न होवोत पण त्यांची सोबत आवडते, असे सांगतात नेहरू यात. मला रेल्वे प्रवासात त्याचा प्रत्यय येतो. भाषा यावर नेहरू यांचे विचार फार आधुनिक आहेत. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच हवे. जिथे गरजेची तिथे उर्दू, फारशी, रोमन लिपी वापरायला हवी. मी हे लिहिताना रोमन लिपीतून लिहितोय तेव्हा मजेशीर योगायोग वाटतो. संस्कृत जुनी कागदपत्रे, पुस्तके समजून घेण्यासाठी म्हणून ठीक, तिचे फार आवडंबर करणे अयोग्य. हिंदी हीच राष्ट्रभाषा होऊ शकते, हे ही सांगतात विस्तारपूर्वक. भाषेच्या बाबतीत महात्मा गांधी यांच्यावर एके ठिकाणी टीकाही केलीय उदाहरण देऊन. God is truth and Truth is God. Nonviolence is Truth, Truth is Nonviolence. हे फसवे वाटते त्यांना. एका मित्राबरोबर चर्चा करताना हिंदीत जागतिक ताकदीचे लेखन होत नाही, असे निरीक्षण त्यांनी मांडले. ते एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले, टीकाही झाली. त्यावर १९३५ साली पॅरिस येथे झालेल्या International Congress of Writers for Defence of Culture (संस्कृतीच्या बचावासाठी जागतिक लेखक परिषद) यातील चर्चेच्या विषयांची यादी त्यांनी दिली, तसेच अशी पुस्तके असतील तर मला सांगा मी विधान मागे घेतो? पण कसले काय? ती यादी वाचताना आपल्या संमेलनातील विषय अन् कार्यक्रम म्हणजे निव्वळ उत्सवप्रियता वाटते. राजकारण, त्यात गुंतून पडावे लागते पण आवडत नाही. लोकांना सामोरे जाताना चेहऱ्यावर हसू पण मनात वेगळेच काही याचा मधून-मधून उल्लेख येतो. तेव्हा जाणवते एका नेहरूत दोन नेहरू. एक राजकारणी, मुत्सद्दी तर दुसरे कवी मनाचे भटकंती, साहित्य, कला यांचे उपासक. लोकमान्य टिळक यांनी एके ठिकाणी म्हटलंय,



**सुखदेव काळे**
दापोली, रत्नागिरी
९७६६७७३८५०

**ग्रंथपरिचय**




मला राजकारणात यायला लागले नसते तर मी गणिताचा शिक्षक झालो असतो, ते माझे आवडते क्षेत्र. नेहरू यांच्या बाबतीत असेच काही झाले असते. ते जागतिक कीर्तीचे लेखक, तत्ववेत्ते झाले असते बहुदा. वाचनीय आहे पुस्तक आणि स्वस्तही.

**पुस्तक : राजनीती से दूर.**
**लेखक : जवाहरलाल नेहरू.**
**सस्ता साहित्य मंडल प्रकाशन, नई दिल्ली.**
**पृष्ठ संख्या : १७२/– रुपये,**
**किंमत : ६५/– रुपये.**
**(लेखक दापोली, रत्नागिरी येथील कृषी विद्यापीठात कार्यरत होते)**

# मोबाईलचा अतिवापर टाळा, डोळ्यांची निगा राखा– डॉ. चिटगोपेकर

## नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहमदनगर । समीर मन्यार**

डोळे हा शरीराचा अत्यंत महत्त्वाचा व अविभाज्य घटक असून त्याची योग्य काळजी घेतली नाही, तर भविष्यात गंभीर नेत्रविकारांना सामोरे जावे लागू शकते. सध्या मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान वयातच डोळ्यांचे आजार वाढत असल्याचे चित्र दिसत असून पालकांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी केले. स्व. डॉ. प्रकाश चिटगोपेकर यांच्या ७० व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त प्रकाश नेत्रालय येथे आयोजित अत्याधुनिक नेत्र तपासणी शिबिरात ते बोलत होते. या शिबिरास शहर व परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. डॉ. चिटगोपेकर म्हणाले की, मोबाईल, संगणक व टीव्हीचा वाढता वापर डोळ्यांवर ताण निर्माण करतो. त्यामुळे डोळे कोरडे पडणे, डोकेदुखी, डोळ्यांत जळजळ, दृष्टी धूसर होणे असे त्रास वाढत आहेत. बालवयातच चष्म्याचे प्रमाण वाढत असून पालकांनी मुलांना मोबाईलपेक्षा मैदानी खेळ, वाचन व सर्जनशील उपक्रमांची सवय लावावी. डोळ्यांच्या आरोग्यासाठी आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे व पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा. दिवसातून दोन ते चार वेळा स्वच्छ पाण्याने डोळे धुणे तसेच सकाळी डोळ्यांचे प्राणायाम व सोपे व्यायाम नियमित करावेत, असा सल्ला त्यांनी दिला. या शिबिरात अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने रुग्णांची सखोल नेत्र तपासणी करण्यात आली. दृष्टीदोष, काचबिंदू, डोळ्यांचा दाब, रेटिनाची तपासणी आदी सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. शिबिराच्या माध्यमातून डोळ्यांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी अशोक तोरडमल, बाबासाहेब मोहिते, शगुफ्ता शेख, मयूर सोनार यांच्यासह मोठ्या संख्येने रुग्ण व नागरिक उपस्थित होते.



# ‘प्रसाद नको, जगण्यासाठी वेतन हवे!’ कामगारांच्या घोषणा

## नवीन कराराबाबत अवतार मेहेर बाबा कामगार युनियनची बैठक

**अहमदनगर । रयत समाचार**

लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियनची महत्त्वपूर्ण बैठक अरणगाव येथे पार पडली. या बैठकीत अवतार मेहेर बाबा ट्रस्ट व कामगारांमधील नवीन कराराबाबत सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. वाढती महागाई, अपुरा पगार व कामगारांचे भवितव्य या मुद्द्यांवर कामगारांनी ठाम भूमिका मांडली.

नवीन भरती करताना वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या जुन्या कामगारांच्या कुटुंबीयांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी युनियनने केली. यावेळी “प्रसाद नको, जगण्यासाठी वेतन हवे!” अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. ही बैठक भाकपचे राज्य सचिव कॉ. अॅड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी लाल बावटा जिल्हा सचिव कॉ. अॅड. सुधीर टोकेकर, युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार यांच्यासह संजय कांबळे, विजय भोसले, राधाकृष्ण कांबळे, सुनील दळवी, राजेंद्र मोरे, चंद्रकला देशमुख, सुवर्णा शिंदे, श्रीनाथ पाटोळे, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, गणेश गहिले, सुनिता जावळे, रामदास कल्हापूरे, दिगंबर माने आदी पदाधिकारी व मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते. कॉ. अॅड. सुभाष लांडे म्हणाले की, सर्व मागण्यांचा डिमांड नोटीसमध्ये समावेश करून कामगारांच्या हिताचा करार केला जाईल. वाढत्या महागाईत कुटुंब चालेल अशी वेतनवाढ अत्यावश्यक आहे. कॉ. अॅड. सुधीर टोकेकर यांनी जुन्या कामगारांचे योगदान अमूल्य असल्याचे नमूद करत, त्यांच्या कुटुंबीयांना नोकरीत प्राधान्य व सन्मानाने जगता येईल असा पगार देण्याची गरज अधोरेखित केली. प्रास्ताविकात सतीश पवार यांनी एकजुटीने लढा दिल्यास करार कामगारांच्या हिताचा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. पाहुण्यांचे स्वागत विजय भोसले यांनी केले, तर आभार संजय कांबळे यांनी मानले.

# पत्रकारितेचा दीपस्तंभ : आचार्य बाळशास्त्री जांभेकर

आज मराठी पत्रकार दिन. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८८२ मध्ये ‘दर्पण’ हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले होते. आजचा दिवस म्हणूनच महाराष्ट्रात ‘मराठी पत्रकार दिन’ म्हणून साजरा केला जातो. जांभेकर यांनी दर्पण या मराठी वृत्तपत्राद्वारे देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ मध्ये कोकणातील पोंभुर्ले या गावात एका सामान्य कुटुंबात झाला होता. जांभेकर यांचे जीवनमान अवघ्या ३४ वर्षांचे होते. मात्र, जांभेकर यांच्या कामाची पद्धत, त्यांच्या विचारांचा ठेवा आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आजच्या या मराठी पत्रकार दिनानिमित्त आपण बाळशास्त्री जांभेकर यांच्याबद्दलच्या काही आठवणी. दर्पण या वृत्तपत्राद्वारे मराठी भाषेतील पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे, इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्च विद्याविभूषित, व्यक्तिमत्त्व म्हणजे बाळशास्त्री जांभेकर होत. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा होता. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवला. जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी बेंगॉल गॅझेटच्या आगमनानंतर तब्बल अर्ध्या दशकाने बाळशास्त्री जांभेकर या विद्वानानं दर्पण च्या रुपाने पहिले मराठी वृत्तपत्र सुरु केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र. या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रितीने साडेआठ वर्षे चालले आणि जुलै १८४० ला त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. देशाची प्रगती, आधुनिक विचार आणि संस्कृतीचा विकास यासाठी वैज्ञानिक ज्ञानाची गरज आहे. तसेच सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या विवेकनिष्ठ भूमिकेसाठी शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराची आवश्यकता आहे, याची जाणीव त्यांना झाली होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते. साधारणपणे १८३० ते १८४६ या काळात बाळशास्त्रींनी आपले योगदान देशाला दिले. या काळात समाज बहुसंख्येने निरक्षर, अंधश्रद्धाळू व अज्ञानी होता. ६ जानेवारी ला पहिला अंक प्रसिद्ध झाला. हाच योगायोगाने बाळशास्त्रींचाही जन्मदिवस. त्यांच्या स्मृत्यर्थ हाच दिवस पत्रकार दिन म्हणून आज महाराष्ट्रात साजरा केला जातो.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा वापर केला. त्याचबरोबर जातीभेद निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख “आद्य समाजसुधारक“ असा केला जातो.





**शफीक बागवान**
९८६०४००६८५
श्रीरामपूर

**समाजसंवाद**